

संस्कृत साहित्य सरिता

प्रतिज्ञायौगंधरायण

संस्कृत
साहित्य
सरिता
:२५

भास-कृत

प्रतिज्ञा यौगंधरायण

कथासार
अमरेन्द्र

वोरा ॲन्ड कंपनी, पब्लिशर्स (प्रायव्हेट) लि०

प्रकाशक :
एम्. के. वोरा
वोरा अँन्ड कंपनी,
पब्लिशर्स (प्रायव्हेट) लि०
३ राउंड बिल्डिंग,
काळबादेवी रस्ता, मुंबई २

किंमत सहा आणे
पहिली आवृत्ति : १९५६

मुद्रक :
अनंत चिंतामण रायरीकर
'स्वस्तिक मुद्रणालय'
४३९ शनवार पेठ, पुणें २

संस्कृत-साहित्य-सरिता

विशाल महासागराला असंख्य नद्या येऊन मिळत असतात. अशा अगणित नद्यांनींच अमर्याद सागर बनलेला असतो. संस्कृत साहित्याचा महासागरहि असाच अनेक सरितांनीं समृद्ध झालेला आहे. 'संस्कृत-साहित्य-सरिता' असें नांव दिलेल्या या वाङ्मयमालेतून आपली आदिभाषा जी संस्कृत तिच्यांतील उत्तम उत्तम वाङ्मयाचा कथारूपानें थोडक्यांत परिचय करून देण्याचें आम्ही योजिलें आहे. संस्कृत वाचणारे थोडे आणि समजणारे तर त्याहून कमी. तेव्हां आजच्या सर्वसामान्य माणसाला, लिहितां-वाचतां येऊं लागलेल्या नवशिक्षितालाहि या संस्कृत-वाणीचा आस्वाद कसा घेतां येणार? परंतु त्यांना तो मिळणें तर आवश्यक आहे; कारण संस्कृत भाषेंतील वाङ्मय हा आपला फार थोर वारसा आहे. तो गमावणें म्हणजे सर्वस्वच गमावून बसणें. यासाठींच संस्कृत भाषेंतील थोर, प्रसिद्ध अशा वाङ्मयकृतींचें, नाटकांचें आणि काव्यांचें, कथासार आम्ही वाचकांपुढें सादर करीत आहोंत.

आम्ही असें समजतों कीं, देवभाषेंतील या वाङ्मयीन कलाकृतींचा परिचय करून देण्याची आमची ही योजना एक चांगली योजना आहे—एक सत्संकल्प आहे. आणि असे सत्संकल्प उत्तम रीतीनें तडीला नेण्याचें काम जनताजनार्दनाचेंच आहे. तें तसें घडो, हीच इच्छा.

—प्रकाशक

प रि च य

भासाच्या नाटकांतील सर्वांत प्रसिद्ध व सर्वांत उत्तम असें जें 'स्वप्नवासवदत्ता' नाटक त्याच्या पूर्वीचें कथानक 'प्रतिज्ञायौगंधरायण' नाटकांत आहे. चारच अंकाची ही लहानशी नाटिका वत्सराज उदयनाच्या चरित्रांतील एका ऐतिहासिक प्रसंगावर आधारलेली आहे असें म्हणतात. 'स्वप्नवासवदत्ता'प्रमाणें यांतहि अमात्य यौगंधरायणाची पराकाष्ठेची स्वामिनिष्ठा आणि पाताळयंत्री बुद्धिमत्ता दृष्टोत्पत्तीला येते. सर्व नाटिकेंत सुरुवातीपासून शेवटपर्यंत यौगंधरायणाचीच भूमिका प्रमुखपणें डोळ्यासमोर येत असल्यानें नाटिकेचें नांव अगदीं यथार्थ वाटतें. यौगंधरायणाची स्वभावरेखाहि तशीच ठसठशीत रंगविली गेलेली आहे. मात्र प्रारंभींच्या दोन अंकांत नाटकाची जी पकड राहाते ती पुढील दोन अंकांत उरत नाहीं.

सोपी भाषा, सुटसुटीत वाक्यें व सुबोध शैली हे भासाचे गुण याहि नाटकांत आहेत. तत्कालिन लोकस्थितीचें प्रतिबिंब या नाटकांत चांगल्या रीतीनें पाहावयास सांपडतें नाट्यप्रयोगाच्या दृष्टीनें भासाचीं सर्वच नाटकें उत्कृष्ट असल्याचें एका पाश्चिमात्य पंडितानें म्हटलें आहे त्याचें प्रत्यंतर याहि नाटकावरून येण्यासारखें आहे.

—लेखक

प्रतिज्ञायौगंधरायण

वत्सदेशचा राजा उदयन तलवार चालवण्यांत जितका पटाईत होता तितकाच तो वीणा वाजविण्यांतहि निपुण होता. प्रख्यात भरतवंशांत उदयनाचा जन्म झाला होता. त्या वंशांत अनेक राजर्षि होऊन गेले होते. उदयनाचे पूर्वज पराक्रमी होते तसेच विद्याकलांनींहि संपन्न होते. विशेषत: वडिलार्जित गांधर्वविद्येचा अभिमान उदयनाला फार होता. या विद्येबरोबरच चालत आलेली 'घोषवती' नांवाची वीणा हीहि कौशाम्बीच्या राजघराण्याची एक अभिमानाची वस्तु होती.

परंतु कांहीं झालें तरी अती तेथें माती! उदयन या गायन-वादनाच्या छंदांत इतका रमून जाऊं लागला कीं, त्याला राज्यकारभाराचाहि विसर पडूं लागला. त्यांतच त्याला शिकारीची चटक लागली. 'घोषवती' वीणा हातीं घ्यावी आणि खुशाल दाट जंगलांत जाऊन ती वाजवीत बसावें आणि तिच्या नादानें रानटी हत्तींना भुलवून आणावें असा त्याचा उद्योग सुरू झाला. त्याच्या शत्रूंनीं त्याच्या या दोषाचा फायदा घेण्याचें ठरविलें.

वत्स व अवंती या देशांच्या सीमा एकमेकींना लागून होत्या. अवंतीराज प्रद्योत हा त्याच्या प्रतापामुळें 'चण्ड-महासेन' म्हणून ओळखला जात असे. परंतु वत्सराज उदयनाला प्रद्योताच्या या 'महासेन' पदवीची कधींच मातब्बरी वाटली नाहीं. त्याकाळीं मगध, काशी, वंग, सौराष्ट्र, मिथिळा इत्यादि अनेक लहानमोठीं राज्यें अवंतीच्या आजूबाजूला पसरलेलीं होतीं. त्यांपैकीं कोणाहि राजाला अवंतीराज महासेनाचा धाक वाटत असे. त्याच्याशीं सख्य राखण्याकरितां ते उत्सुक असत. परंतु वत्सराज उदयनाला मात्र यांपैकीं कशाचीहि पर्वा नव्हती. तो स्वतःच्या भरत-कुलाबद्दल अभिमान बाळगी. कोणापुढें मान लववावयाची नाहीं अशा ताठ्यानें राही. त्याचा मंत्री यौगंधरायण हा राजनीतींत अत्यंत हुषार होता आणि सेनापति रुमण्वान महापराक्रमी होता. तसेच ते दोघेहि कमालीचे स्वामिनिष्ठ होते. त्यामुळें यौगंधरायण अमात्यपदावर असतांना उदयनाचें कांहींहि वांकडें करणें अशक्य आहे अशी चण्डमहासेनाचीहि खात्री होती. तथापि वत्सराज कधीं तरी आपल्या तावडींत सांपडावा यासाठीं तो वाट पाहात होता. लवकरच त्याचा मुख्य मंत्री शालंकायन यानें त्याला तशी संधी आणून दिली.

वत्सराजाचा महामंत्री यौगंधरायण अतिशय गडबडींत होता. त्याला अशी कुणकुण लागली होती कीं, प्रद्योतानें वत्सराजाला जाळ्यांत पकडण्यासाठीं एक डाव टाकला आहे. रानहत्तींमध्यें सहज ओळखतां येणार नाहीं असा निळ्या रंगाचा एक कृत्रिम हत्ती तयार करून त्यानें नागवनामध्यें ठेवला आहे आणि त्याला भुलवून पकडण्यासाठीं वत्सराज स्वतः तेथें येईल तेव्हां त्यालाच पकडून पळवून नेण्याचें कारस्थान रचलें गेलेलें आहे, असें यौगंधरायणाच्या कानापर्यंत आलेलें होतें. अर्थातच तो स्वामिनिष्ठ व दक्ष मंत्री राजाच्या रक्षणासाठीं तांतडीनें उद्योगाला लागला.

यौगंधरायणाचा सालक नांवाचा एक स्वामिभक्त नोकर होता. तो शरीरानेंहि चांगला दांडगट होता. म्हणून यौगंधरायणानें त्याला एक पत्र व रक्षक-सूत्र बरोबर देऊन तांतडीनें वत्सराजाकडे पाठविण्याचें ठरविलें. त्याप्रमाणें सालक सज्ज होऊन समोर येऊन उभा राहिला. यौगंधरायणानें अंतःपुराची द्वाररक्षिका विजया हिला पत्र व रक्षक-सूत्र लवकर घेऊन येण्याबद्दल सांगितलें. ही गडबड चाललेली आहे इतक्यांत उदयन राजापाशीं नेहमीं असणारा त्याचा हुजऱ्या हंसक यौगंधरायणाच्या भेटीला आला असल्याचें समजलें. तो एकटाच परतलेला पाहून अमात्य मनांत चरकलाच. त्यांत हंसकानें जेव्हां येऊन सांगितलें

कीं महाराज नागवनांत पूर्वींच निघून गेले, तेव्हां तर तो हतबुद्धच होऊन गेला. अखेर त्याला समजलें कीं महाराज पकडले गेले.

हंसक बराच लांबून आला होता, तेव्हां त्याला थोडी विश्रांति देऊन अमात्यानें हें सर्व कसें घडलें त्याची हकीकत त्याला विचारली. हंसक शेवटपर्यंत उदयनाबरोबरच असल्यामुळें त्यानें ती इत्थंभूत सांगितलीहि.

हंसक सांगूं लागला : नर्मदेच्या पैलतीरावरील वेणुवनांत आल्यावर उदयन तेथें थोडा वेळ थांबला आणि लगेच पुढें नागवनांत निघून गेला. हत्तीच्या शिकारीसाठीं तो अतिशय उत्सुक झाला होता. यामुळें त्यानें आपल्याबरोबर फक्त शिकारीपुरेसे थोडेसेच शिपाई घेतले होते. त्यांच्यासह तो पुढें चालला असतांना मदगंधीर पर्वताच्या अलीकडेच त्याला एक हत्तींचा कळप आढळला. त्या कळपांतील हत्तींचीं अंगें चिखलानें माखलेलीं असल्यामुळें तीं अर्धवट दगडाचींच असल्यासारखीं वाटत होतीं. इतक्यांत पायदळांतील एक शिपाई महाराजांसमोर येऊन उभा राहिला.

परंतु यावेळीं हंसकाला मध्येंच थांबवून यौगंधरायणानें म्हटलें, " त्यानें असें सांगितलें ना कीं, येथून कोसाच्या अंतरावर मल्लिकावेली व सालाचीं झाडें यांच्या गर्दीत

झांकून गेलेला एक हत्ती मीं बघितला. त्याचे केवळ दांत व नखें सोडून सगळें शरीर निळेंभोर आहे. ”

अमात्यांना हें इतक्या दूर असून कसें समजलें म्हणून हंसक आश्चर्यच करीत राहिला. परंतु त्याहिपेक्षां त्याला नवल वाटलें तें अमात्य इतके जागरूक असतांना शेवटीं जें व्हायचें तें झालेंच म्हणून. तेव्हां अमात्यांनीं त्याचें समाधान करीत म्हटलें, “ बाबारे, जागरूकतेपेक्षांहि भवितव्यता अधिक बलवान आहे ! ”

त्यानंतर हंसक पुन्हां उदयन महाराजांवरील अनर्थाची हकीकत पुढें सांगूं लागला : पायदळ शिपायाची ती माहिती ऐकून महाराजांना मोठा हर्ष झाला. त्यांनीं त्याला शंभर सुवर्णमुद्रा बक्षिशी म्हणून दिल्या. ते म्हणाले, ‘ नीलकुवलयतनु या नांवाचा चक्रवर्ती हत्ती असल्याचें मीं हस्तिशिक्षेंत वाचलें आहे. ’ त्या चक्रवर्ती हत्तीला आपल्या वीणावादनाच्या साहाय्यानें पकडण्याचा त्यांचा निश्चयच झाला. अमात्य रुमण्वान त्यावेळीं त्यांच्यापाशींच होते. त्यांनीं त्यांना नानाप्रकारें सांगून पाहिलें, परंतु महाराजांचा निश्चय बदलला नाहीं. रुमण्वानानें सांगितलें कीं तो प्रदेश असुरक्षित आहे, कोणत्या वेळीं कसलें संकट येऊन उभें राहील याचा नेम नाहीं. तरी महाराजांनीं त्यांच्या सांगण्याकडे लक्ष दिलें नाहीं. उलट स्वतःच्या प्राणाची

शपथ घालून त्यांना परत फिरावयास लाविलें आणि बरोबर फक्त निवडक वीस लोक घेऊन ते जाण्यास तयार झाले. आपल्या हत्तीवरून उतरून ते पाटल नांवाच्या घोड्यावर स्वार झाले आणि सूर्य डोक्यावर येण्याच्या-पूर्वींच त्यांनीं नागवनाकडे प्रयाण केलें.

जलदीनें पुढें गेल्यानंतर सालवृक्षांच्या छायेंत त्या नील हत्तीचे पांढरे दांत चमकतांना दिसूं लागले. आणि सुमारें शंभर गजांवरून तर तो दिव्य हत्तीहि स्पष्ट नजरेला पडला.

तेथें जाऊन पोहोंचतांच महाराजांनीं घोड्यावरून उतरून देवतांना नमस्कार केला आणि ' घोषवती ' वीणा हातांत घेतली. इतक्यांत आमच्या पाठीमागच्या बाजूनें एक प्रचंड सिंह येतांना दिसला म्हणून त्याच्या निवारणा-साठीं आम्ही सर्वजण तिकडे वळलों. तोंच तो निळ्या रंगाचा हत्ती आमच्यापाशीं येऊन थडकला. पाहातों तों तो एक कृत्रिम हत्ती होता आणि हां हां म्हणतां त्याच्या पोटांतून अनेक योद्धे बाहेर पडूं लागले. हें सारें अवंतीराज प्रद्योताचें कपट आहे हें महाराजांनीं तेव्हांच ताडलें व ते बरोबरच्या शिपायांना सूचना देऊन स्वतः पुन्हां स्वार होऊन शत्रुसैन्यावर वेगानें चालून गेले. परंतु शत्रूची संख्या फार मोठी असल्यामुळें अखेर महाराज लढतां लढतां थकून गेले. त्यांचा सुंदर घोडा पाटलहि जखमी

होऊन पडला आणि महाराजहि थोड्याच वेळांत बेशुद्ध झाले.

लगेच शत्रूच्या लोकांनीं महाराजांना एखाद्या सामान्य माणसाप्रमाणें रानवेलींनीं करकचून बांधून टाकलें. इतकेंच काय पण महाराज शुद्धीवर आल्यावर त्यांच्या हातून केवळ दैवानेंच जिवंत राहिलेले योद्धे त्यांना ठार मारावयास उद्युक्त झाले. परंतु प्रद्योताचा अमात्य शालंकायन यानें त्यांच्या कचाटयांतून महाराजांना सोडविलें आणि ते घोडयावरून नेण्याच्या स्थितींत नसल्याकारणानें मेण्यांतून तो त्यांना आपल्याबरोबर घेऊन गेला.

हंसक पुढें म्हणाला कीं, मी शेवटपर्यंत त्यांच्याबरोबरच होतों. उज्जयिनीला त्यांच्याबरोबर जावें असें माझ्या मनांत होतें. परंतु शालंकायनानें मला मुद्दाम हें वर्तमान कळविण्यासाठीं इकडे पाठवून दिलें. महाराजांनींहि निघतांना मला निरोप सांगितला कीं, "यौगंधरायणाला भेट."

यौगंधरायण आणि रुमण्वान हे दोघे सचीवपदावर असतांना वत्सराज उदयन कपटानें पकडला जावा यांत सचीवांच्या कीर्तीला काळिमा लागला आणि त्यांचें बळ कुचकामी ठरलें हें उघडच होतें. अर्थातच ही गोष्ट योगंधरायणाच्या मनाला फार लागली. त्यांत उदयन

महाराजांनीं त्याला स्वतःला 'तूं भेट' म्हणून निरोप पाठविला हें तर त्याला विशेष जाणवलें. इतर कोणा अमात्यांचें नांव न घेतां मुद्दाम यौगंधरायणाचेंच नांव उदयनानें घेतलें होतें. 'आपल्याला राजावरील अरिष्ट टाळतां आलें नाहीं, त्याच्या उपकाराचें उतराई होतां आलें नाहीं, खाल्ल्या अन्नाला आपण जागूं शकलों नाहीं' असा तो स्वतःला बोल लावूं लागला; आणि ज्या अर्थी अशा स्थितींतहि महाराजांनीं आपलेंच नांव घेऊन आपल्याला भेटण्याविषयीं आज्ञा केली आहे त्या अर्थी काय वाटेल तें करून त्यांची भेट घेणें हें आपलें कर्तव्यच आहे असें यौगंधरायणानें ठरविलें. लगेच त्यानें तशी प्रतिज्ञाहि करून टाकली.

"शत्रु-राजधानींत, कारागृहांत, अरण्यांत कोठेंहि मी महाराजांची गांठ घेईन. मग त्यासाठीं मला स्वतःच्या प्राणांचें मोल द्यावें लागलें तरी हरकत नाहीं. आणि प्रद्योताला जरी कितीहि वाटत असलें कीं आपण उदयनाला पकडलें म्हणजे आपण जिंकली तरी त्याच्याहि हातावर तुरी देऊन मी महाराजांची भेट घेतल्याशिवाय कदापि राहाणार नाहीं."

ही प्रतिज्ञा यौगंधरायणाची होती; कोणा सामान्य माणसाची नव्हती. संकटांचाहि जो विषाद मानीत नाहीं,

अडचणीच्या परिस्थितींतहि जो हात जोडून स्वस्थ बसत नाहीं, कपटानें फसवला गेला तरी जो निरुत्साह होत नाहीं आणि एकदां हातीं घेतलेलें काम कितीहि प्रत्याघात झाले म्हणून प्राण गेले तरी सोडून देणार नाहीं, अशी यौगंधरायणाची ख्याति होती. वत्सराजाचा बुद्धिमान अमात्य, उदयनाचा परममित्र आणि राजमातेच्या पुत्रवत् प्रेमाला पात्र झालेला यौगंधरायणच वत्सराजावरील हें संकट नाहींसें करण्याला समर्थ होता. राजमातेनेंहि त्याला तसाच उत्साहवर्धक निरोप पाठवून कळविलें होतें कीं, 'मी तुलाहि पुत्रच मानतें, तेव्हां माझ्या दुसऱ्या पुत्राला तूं सोडवून आणलेंच पाहिजेस.' तेव्हां अमात्य यौगंधरायणानें हातांत पाणी घेऊन आचमन केलें आणि प्रतिज्ञा उच्चारली-"राहुग्रस्त चंद्रम्याप्रमाणें शत्रूच्या तावडींत सांपडलेल्या राजाला सोडवून आणणार नाहीं तर मी नांवाचा यौगंधरायणच नव्हे !"

अवंतीराज महासेनाच्या डोक्यांत सध्यां एक प्रश्न सारखा घोळत होता. 'आपली आवडती वासवदत्ता कोणाला द्यावी.' मगधाधिपति, काशिराज, अंगराज, सौराष्ट्र-नरेश, मिथिलाधिपति, शूरसेन अशा अनेक राजांकडून आतांपर्यंत राजकन्या वासवदत्तेला मागणी घालण्यांत

आलेली होती. दररोज कोठल्या ना कोठल्या मोठ्या राजघराण्याकडून राजदूत येत, वासवदत्तेसाठीं मागणी घालीत; परंतु महासेन त्यांपैकीं कोणालाच ना होकार देई ना नकार! म्हाताऱ्या बादरायण नांवाच्या कंचुकीला राजाच्या या विचित्र वागण्याचें मोठें नवल वाटत होतें. अखेर एक दिवस त्यानें राजाला त्या बाबतींत छेडलेंहि. तेव्हां राजा म्हणाला, "बादरायण, तुम्ही म्हणतां तें खरेंच आहे. पण वासवदत्ता आमची फार लाडकी. तिचा पति सर्वगुणांनीं संपन्न असावा अशी हांव आम्हांला असणारच. आणि त्यामुळेंच या बाबतींत नक्की कांहीं ठरविणें मोठें कठीण होऊन बसलें आहे. आपल्या मुलीसाठीं वर शोधावयाचा म्हणजे त्याच्या अंगीं कोणते गुण नकोत ! आधीं कुल उत्तम हवेंच. तसाच तो अंतःकरणानें प्रेमळ व शरीरानें बलवानहि असायला हवा. त्याचें रूप व शरीरकांती स्त्रिया पाहाणारच. आणि शिवाय स्त्रियांचें रक्षण करण्याइतका पराक्रमहि त्याच्या अंगांत असल्यावांचून चालणार नाहीं."

पण त्याच्या स्वतःसारखा असा सर्वगुणसंपन्न जांवई महासेनाला कोठून मिळणार ! तरीपण त्याच्यासंबंधीं कांहींतरी विचार करणें प्राप्तच होतें. त्यांत उपवर मुलींची काळजी पित्यापेक्षां मातेलाच अधिक वाटते. म्हणून महासेनानें राणी अंगारवतीला बोलावून आणण्यास कंचुकीला सांगितलें.

त्याच दिवशीं काशिराजाकडून वासवदत्तेला मागणी घालण्याकरितां त्याचा उपाध्याय जैवंती आला होता. त्यावरून महासेनाला आठवण झाली कीं आपण शालंकायनाला वत्सराजाला पकडण्यासाठीं पाठविलें आहे त्याची वार्ता अजून कांहीं आलेली नाहीं. परंतु इतक्यांत अंगारवती राणी तेथें आल्यामुळें महासेनाचें तिच्याशींच बोलणें सुरू झालें.

अंगारवतीकडून महासेनाला कळलें कीं वासवदत्ता अलीकडे संगीतकलेचा अभ्यास करीत असून कांचनमालेच्या नादानें ती वीणावादन शिकत असते. हळुहळु वासवदत्तेच्या विवाहाबद्दल बोलणीं निघालीं. वासवदत्ता उपवर झाली आहे हें राणीलाहि कबूल होतें. परंतु ती लग्न झाल्यावर सासरीं जाणार व आपल्याला दुरावणार या विचारानें तिला खेदहि होत होता. मगधराजापासून मिथिलाधिपतीपर्यंत अनेकांचीं नांवें घेऊन यांतला कोण जांवई म्हणून तुला पसंत आहे असा प्रश्न महासेनानें तिला विचारला. परंतु तिनें उत्तर देण्यापूर्वींच कंचुकी सांगत आला कीं वत्सराज पकडला गेला.

आपला अमात्य शालंकायन यानें वत्सराज उदयनाला पकडलें या कंचुकीच्या बातमीवर प्रथम महासेनाचा विश्वासच बसेना. त्यानें आपली खात्री करून घेण्याकरितां

त्याला अनेक प्रश्न केले. शेवटीं त्यानें विचारलें, " मग यौगंधरायण वारला कीं काय ?" त्यावर कंचुकीनें " नाहीं, तो तर कौशाम्बीला आहे, " असें उत्तर देतांच महासेन म्हणाला, " मग, वत्सराजाला पकडलेंच नाहीं. "

परंतु अमात्य शालंकायन स्वतःच बंदी वत्सराजाला बरोबर घेऊन आला होता. त्यामुळें खरेंखोटें म्हणायला जागाच नव्हती. महासेनाला सारी पृथ्वी आतां वीररहित झाली, निष्कंटक झाली. तो उद्‌गारला, " मी आतां खराखुरा महासेन झालों. " पण राणी अंगारवतीनें स्पष्ट सांगितले कीं, " आतां या निमित्तानें यालाच वासवदत्ता द्यायची ठरवून टाका. " वास्तविक राजाच्या मनांतहि यापेक्षां कांहीं वेगळें नव्हतें. परंतु तो मानी राजा असल्यामुळें आपल्या मुलीसाठीं उदयनानें स्वतः होऊन मागणी घालावी असें त्याला वाटत होतें. परंतु उदयनहि तितकाच स्वाभिमानी असल्यामुळें तें शक्य नव्हतें.

आज तोच ताठ्यानें वागणारा वत्सराज बंदी म्हणून आपल्यासमोर आणण्यांत आला आहे, हें ऐकून महासेनाचा आनंद गगनांत मावेना. महासेनाच्या या हर्षांत आणखी एका गोष्टीनें भर घातली. भरतवंशीय राजांकडील एक अभिमानास्पद वस्तु-' घोषवती ' वीणाहि शालंकायनानें बरोबर आणली होती, ती महासेनाला अर्पण केली. राजाचा

थोरला मुलगा गोपालक हा अर्थशास्त्राचा अभ्यासू आणि धाकट्या अनुपालकाला गाण्याबजावण्याचा तिटकारा, तो मल्लविद्येचा नादी. म्हणून शत्रूकडून जिंकलेली ही वस्तु महासेनानें आपल्या मुलीला द्यावयाचें ठरविलें.

वत्सराजाला धरून आणलें होतें तरी त्याची व्यवस्था उत्तम प्रकारें ठेवून त्याला सर्व प्रकारच्या सुखसोयी करून देण्याविषयीं राजानें अमात्यांना आज्ञा दिल्या; मागील वैर उकरून न काढतां त्याच्याशीं गोडीगुलाबीनें वागण्याबद्दल सूचना केल्या.

अंगारवती राणीनें जातां जातां सांगितलें कीं, वर-निश्चिती अद्यापि झाली नसेलच; त्या बाबतींत इतक्यांत घाई करूं नका. राजानें बाहेर दाखविलें नाहीं तरी मनांतून मात्र त्याला वाटत होतें कीं वत्सराजाच्या जखमा लवकर भरून येऊन त्याला बरें वाटूं लागावें. महासेन मनांत मांडे खात होता कीं, वत्सराज आतां आपल्या पुरा हातांत सांपडला आहे. आतां आपण त्याला वांकवूं तसा तो वांकेल. पण यौगंधरायण कांहीं स्वस्थ बसला नव्हता.

अमात्य यौगंधरायण, सचिव रुमण्वान आणि विदूषक वसंतक हे तिघेहि वेष पालटून उज्जयिनींत येऊन राहिले

होते. अर्थातच महाराज उदयनांची सुटका करणें हेंच त्यांचें उद्दिष्ट होतें. यौगंधरायणानें वेड्याचें सोंग घेतलें होतें. रुमण्वान श्रमणकाच्या वेषांत होता आणि विदूषक वसंतक एक ब्राह्मण उपासक म्हणूनच उज्जयिनींत वावरत होता.

यौगंधरायणानें आपल्या हेरांचें जाळें सर्वत्र पसरलें होतें. उदयनाच्या सुटकेची एक योजना ठरवून त्यानें वसंतका-करवीं ती उदयनाच्या कानावर घातली. त्याप्रमाणें राजा तयार आहे ना हें समजून घेण्यासाठींच यौगंधरायण, रुमण्वान आणि वसंतक असे तिघेहि आडबाजूला एका अग्निशाळेंत जमले होते. वसंतक उदयन राजाला भेटून आला होता. त्यानें राजाच्या सुटकेसाठीं यौगंधरायणानें आंखलेली योजना राजाच्या कानावर घातली. परंतु राजा-चा विचार कांहीं निराळाच होता; आणि त्याला तसें कारणहि होतें.

राजकुमारी वासवदत्तेवर उदयनाचें मन जडलें होतें. एक दिवस पालखींत बसून ती देवीच्या दर्शनासाठीं जात असतां तिची पालखी उदयन बंदींत पडला होता त्या ठिकाणासमोरच थांबली. उदयनानें तेथील पहारेकऱ्याला वश करून घेऊन वासवदत्तेची भेट घेतली आणि त्याच-वेळीं दोघेंहि एकमेकांवर अनुरक्त झालीं. उदयनानें

विदूषकाच्या हातीं यौगंधरायणाला निरोप पाठविला होता कीं, ' येथून नुसतेंच निसटून जाण्यांत कांहीं विशेष हंशील नाहीं. जातां जातां प्रद्योताच्या अभिमानालाहि एखादा तडाखा लगावतां येईल आणि आपल्या झालेल्या विटंबनेचा मोबदला घेतां येईल असें कांहीं करण्याचा माझा मानस आहे. '

आपला राजा अगदीं विपरीत रीतीनें पकडला जाऊन बंदींत पडला असतांनाहि त्याला हे प्रेमाचे चाळे सुचतात, म्हणून यौगंधरायणालाहि पहिल्यानें विषाद वाटला. जनाची, मनाची सारीच लाज गुंडाळून ठेवल्याप्रमाणें महाराजांचें हें वागणें आहे, असें तो म्हणाला. परंतु अशा त्यांच्या या वागण्यामुळें त्यांच्या सुटकेसाठीं आपण चालविलेल्या प्रयत्नांत यश येण्याची आशा विदूषकाला दिसेना. त्यामुळें त्यानें म्हटलें कीं मग महाराजांच्या भेटीची खटपट आपल्या म्हातारपणापर्यंत करीत बसावें लागेल आणि अर्थातच तोंपर्यंत हें वेषांतरहि कायम टिकवावें लागेल. परंतु स्वामिभक्त यौगंधरायणाला त्याची मुळींच पर्वा नव्हती. त्याला स्वतःचें काय होईल याची काळजी नव्हती, लोक काय म्हणतील याची पर्वा नव्हती, महाराज उदयन आपल्या या खटपटीची वाहवा करतील कीं नाहीं याचीहि फिकीर नव्हती. तो फक्त एवढेंच पाहात होता—उदयनाची सुटका केव्हां व कशी करावयाची.

विदूषकानें उदयनाचें मनोगत त्याला सांगून म्हटलें कीं, तुम्ही जर हें काम एवढ्या चिकाटीनें हातीं घेतलेंच आहे तर महाराज उदयन व राजकन्या वासवदत्ता या दोघांनाहि येथून नेण्याची तजवीज करा. रुमण्वानालाहि वाटलें कीं महाराजांची तशी इच्छा आहे तर आपण या गोष्टीवर विचार करावा. तेव्हां यौगंधरायणानें लगेच दुसरी प्रतिज्ञा उच्चारली : " सुभद्रेला जसा अर्जुन किंवा पद्मलतेला जसा हत्ती त्याप्रमाणें राजा त्या राजकन्येचें जर हरण करणार नाहीं तर मी नांवाचा यौगंधरायणच नव्हें. तसेंच त्या विशालाक्षीसह राजाला मी येथून घेऊन न जाईन तर नांवाचा यौगंधरायणच नव्हें. "

अमात्य यौगंधरायण नुसती प्रतिज्ञा करूनच थांबणारा नव्हता. त्याअगोदरच त्याचे उद्योग सुरू झाले होते.

नलागिरी नांवाचा महासेनाचा मुख्य हत्ती होता. त्याच्या राहाण्या-खाण्याच्या व निजण्या-बसण्याच्या जागीं सर्वत्र मादक वनस्पती टाकून आणि धूप इत्यादींचे प्रयोग करून तो चवताळेल अशी व्यवस्था यौगंधरायणानें करविली. हा हत्तीश्रेष्ठ एकदां भडकला म्हणजे त्याला आवरणें महाकर्म कठीण होतें. त्यामुळें महासेन गडबडून जाईल आणि अनायासें उज्जयिनींत असलेल्या उदयनाला नलागिरीला शांत करण्याची विनंती करील हें स्पष्ट होतें. कारण

घोषवती वीणेच्या वादनानें रानटी हत्तींनासुद्धां उदयन वश करतो हें महासेनाला माहीत होतें. त्याप्रमाणें नलागिरीला ताळ्यावर आणण्यासाठीं उदयनाची बंदीगृहांतून सुटका झाली व घोषवती त्याच्या हातीं आली कीं त्यानें सहज म्हणून नलागिरीवर आरूढ व्हावें आणि त्याच्यावर बसूनच वेगानें कौशाम्बीचा रस्ता सुधारावा असें यौगंधरायणाचें हें कारस्थान होतें.

आयत्या वेळीं या योजनेंत फक्त थोडाच फरक झाला. माजलेल्या नलागिरीला ताळ्यावर आणण्यासाठीं उदयनाची कैदेंतून सुटका झाली. पण पुढें भद्रवती नांवाची महासेनाची जी अति चपळ हत्तीण होती तिचा उपयोग वत्सराजानें पळून जाण्यासाठीं केला. या भद्रवतीचा माहूत गात्रसेवक याला यौगंधरायणाच्या हेरांनीं वश करून घेतलें. पळून जाण्याच्या दिवशीं त्याला भरपूर दारू पाजून त्याची दुसरीकडे रवानगी केली आणि स्वतः वत्सराज आगाऊ ठरविल्याप्रमाणें वासवदत्तेला बरोबर घेऊन भद्रवतीवर बसून कौशाम्बीला निसटून गेला. नलागिरीला भद्रवतीच्या मागें लावून वत्सराजाला पकडण्याचा प्रयत्न महासेनानें केला परंतु तो निष्फळ ठरला; आणि वत्सराज आपल्या राजधानींत सुखरूप जाऊन पोहोंचला.

वासवदत्तेला घेऊन वत्सराज पळून गेला परंतु

यौगंधरायण उज्जयिनींत मागेंच राहिला होता.त्याचे गुप्तचर कृष्णसर्पाप्रमाणें सर्वत्र पसरलेले होते ते एकदम प्रकट झाले व त्यांनीं आपापली कामगिरी बजावली. महासेनाच्या सैन्याशीं त्यांची लढाई जुंपली. स्वतः यौगंधरायणहि तींत सामील झाला. लढतां लढतां विजयसुंदर नांवाचा हत्ती त्याच्यावर चालून आला तेव्हां त्यानें आपल्या हातांतील तलवारीचा एक फटका त्याच्या दांतावर ठेवून दिला. परंतु त्यामुळें तलवार मोडली आणि यौगंधरायण पकडला गेला.

स्वतः पकडला गेल्याचें दुःख यौगंधरायणाला अजिबात नव्हतें. उलट संसारांतून मुक्त झालेल्याला अरण्यवासाचा जो आनंद मिळतो त्याचाच अनुभव तो घेत होता. मनांत बाळगलेला हेतु पुरा झाल्यामुळें अटकेंत पडण्याची आपत्ती कोसळली तीहि त्याला समाधानकारकच वाटत होती. किंबहुना सुख किंवा दुःख हें पूर्वसंचितानुसारच भोगावें लागतें असें समजणारा तो असल्यामुळें बंधनच काय पण त्या कार्यांत प्रत्यक्ष मृत्यु आला असता तरी त्याला त्याचें यत्किंचितहि दुःख वाटलें नसतें. आपल्या राजाला आपण कैदेंतून सोडविलें, संकटांतून मुक्त केलें याचीच त्याला कृतकृत्यता वाटत होती. आणि म्हणूनच हातचें शस्त्र गळून पडून स्वतःला शत्रूच्या हातीं पडावें लागलें व

महासेनाच्या राजवाड्यांत एक बंदी म्हणून प्रवेश करावा लागला याचें त्याला समाधान वाटत होतें.

त्याला पकडून आणीत असतांना उज्जयिनींतील नागरिकांनीं त्याला पाहण्यासाठीं गर्दी केली. सैनिक नागरिकांना बाजूला हटवूं लागले. ते म्हणाले, "अहो, तुम्हीं याला पूर्वी कधीं पाहिलें नसल्यासारखें काय करतां!" त्यावर यौगंधरायणानें म्हटलें, "अहो, तेव्हां पाहिलें तें वेड्याच्या वेषांत! राजावरील माझ्या स्वामिभक्तीमुळें माझी दशा काय झाली हें या राजसेवकांना एकदां पाहूंच दे. तसेंच अमात्यपदाची प्राप्ति व्हावी असें जे मनांतून इच्छित असतात त्यांनाहि मला पाहूं दे, म्हणजे एक तर त्यांची ती मनीषा स्थिर तरी होईल किंवा नाहींशीं तरी होऊन जाईल."

इतक्यांत एका शिपायानें यौगंधरायणापाशीं येऊन सांगितलें कीं, वत्सराज पकडले गेले!

परंतु यौगंधरायणाचा त्या गोष्टीवर विश्वास बसणें शक्यच नव्हतें. तो म्हणाला, "शक्य नाहीं! शत्रूच्या नगरांतून वत्सराज बंधनमुक्त होऊन बाहेर पडले त्याला कितीतरी वेळ झाला. एव्हांना भद्रवतीवर बसून ते अरण्य ओलांडूनहि गेले असतील. निमिषभरांत अनेक योजनें

अंतर ओलांडून गेलेल्या राजाला पकडलें असेल हें कसें शक्य आहे ? बरें, पण त्यांस कसें पकडलें म्हणतां ?"

त्यावर त्या शिपायानें सांगितलें कीं, नलागिरीनें त्यांचा पाठलाग करून त्यांना पकडलें. परंतु तेंहि शक्य नव्हतें. यौगंधरायणाला माहीत होतें कीं, नलागिरीपाशीं बळ आहे पण बुद्धी नाहीं.

नंतर यौगंधरायणाला शस्त्रागाराकडे नेण्यांत आलें. शस्त्रागारावर पाहाऱ्याचा बंदोबस्त कडक असतो म्हणून यौगंधरायणाला तेथें ठेवावें अशी आज्ञा होती. तें ऐकून यौगंधरायण उपहासपूर्वक म्हणाला, "जेव्हां वत्सराज बंदींत होता तेव्हां वास्तविक अधिक बंदोबस्त असावयास हवा होता; परंतु तेव्हां अमात्यांनीं झोंपा काढल्या. आणि आतां रत्न चोरीला गेल्यावर पेटी राखण्याची धांवाधांव हे करीत आहेत !"

यौगंधरायणाला मोकळा करून शस्त्रागारांत ठेवलें. तेथें तो विश्रांति घेत पडला होता. इतक्यांत भरतरोहक हा महासेनाचा अमात्य त्याच्या भेटीसाठीं आला. महासेनाच्या सगळ्या अमात्यांना यौगंधरायणानें आपल्या बुद्धिकौशल्यानें व राजनीतींतील डावांनीं चांगलेंच तोंडघशीं पाडलें होतें. पडलेल्या मल्लाप्रमाणें मान खालीं घालून

आणि शरमूनच भरतरोहक भेटीला आला होता. ‘ नको ही याची भेट ’ असेंहि त्याच्या मनांत येत होतें. डिवचलेला साप फणा उभारून समोर दिसावा तसा यौगंधरायण त्याला समोर दिसत होता. त्याला वाटलें कीं यौगंधरायण आपला उपहासच करीत आहे.

तथापि खालीं बसल्यावर भरतरोहकानें त्याला म्हटलें, “ आजवर आपलें नुसतें नांवच ऐकलें होतें.आज आपल्याला प्रत्यक्ष पाहून मोठा आनंद होत आहे. ”

एथपर्यंत ठीक झालें. परंतु यौगंधरायण पुढें म्हणाला, “ नुसतें पाहून काय म्हणतां; रक्तानें माखलेलें हें माझें शरीर पाहून तरी म्हणा. पित्याचा वध करणाऱ्याला ठार मारल्यानंतर द्रोणपुत्र अश्वत्थाम्याला जसें समाधान लाभलें तसा मीहि आतां शान्तपणें येथें पडलों आहें. ”

हें ऐकतांच मात्र भरतरोहक खवळला. तो म्हणाला, “ कपटानें हत्तीच्या साहाय्यानें केलेल्या पराक्रमाबद्दल केवढी ही प्रौढी ! ”

“ काय कपटानें ? ” यौगंधरायणानें विचारलें. “ मग तुमची ती करणी तरी कितपत योग्य होती ? मल्लिका-वेली व सालवृक्ष यांच्या आड दडवलेल्या हत्तीच्या मिषानें कपट रचून त्यांत तुम्ही आमच्या राजाला पकडून त्याला

हातांची उशी व जमिनीचें अंथरुण करावयास लावलेंत. राजा हत्तींना वश करण्यांत पटाईत आहे हें जाणून वीणेच्या साहाय्यानें तुम्ही कपट केलेंत. तुम्ही घालून दिलेल्या त्या मार्गावरूनच मीहि चाललों; यांत माझ्याकडे कांहीं दोष येत नाहीं."

"अहो पण, यौगंधरायण! हा चोरीचा मामला तरी तुम्हांला कितपत शोभतो!" म्हणून उलट भरतरोहकानें टोमणा मारला. "महासेनाची जी मुलगी अग्निसमक्ष शिष्या म्हणून पत्करली तिचा रीतसर वाङनिश्चय होण्यापूर्वींच वत्सराजानें तिला पळवून नेली ही तर उघड उघड चोरी आहे."

पण यौगंधरायणानें त्यावर प्रत्युत्तर दिलें कीं, "नव्हे, नव्हे, हा तर आमच्या राजांचा विवाहच झाला. भरतकुलोत्पन्न वत्सराज तिचा पत्नी म्हणून स्वीकार केल्यावांचून तिला विद्या देईलच कशी?"

यावर भरतरोहकानें नवीनच मुद्दा काढला. तो म्हणाला, "महासेनांनीं वत्सराजाचा आदरसत्कार केला त्याचें हें फळ त्यांनीं दिलें काय?"

पण यौगंधरायणहि कांहीं कच्च्या गुरूचा चेला नव्हता. त्यानें सांगितलें, "नलागिरी बेफाम झाला, वत्सराजाच्या

शब्दानें तो ऐकेल हें महासेनाला माहीत म्हणून त्यानें वत्सराजाला मुक्त केलें आणि आपला स्वतःचा व आप्त-स्वकीयांचा जीव वांचविला; उगीच नव्हे. आणि पुन्हां कैदेंत टाकलें नाहीं तेंहि वत्सराजावर उपकार म्हणून नव्हे तर लौकिकांत बरें दिसणार नाहीं म्हणून!"

हा अमात्यश्रेष्ठ बोलण्यांतहि आपल्याला हार जाणारा नाहीं हें भरतरोहकानें जाणलें. तेव्हां त्यानें त्याला डिवचण्यासाठीं म्हटलें, "बरें, तें जाऊं द्या. महासेनाची आडकाठी असतांहि कौशाम्बीला स्वतः परत जाण्याची तुमची कांहीं शक्कल आहे कीं काय?"

यौगंधरायण हंसला; म्हणाला, "एवढी उलथापालथ केल्यावर उरलेल्या एवढ्याशा गोष्टीची काय कथा! झाड मुळासकट उपटून टाकल्यावर फांद्या तोडायला कितीसें कठीण!"

परंतु यौगंधरायणाला ते कष्ट घेण्याची गरजच पडली नाहीं. तेवढ्यांत महासेनाच्या कांचुकीयानें येऊन सांगितलें, "तुम्ही जें कांहीं केलेंत त्यांत तुमचा दोष नाहीं; गुण-वानांशीं माझा तंटा नाहीं. तेव्हां हें सुवर्णपात्र आपण स्वीकारावें अशी महाराजांची विनंती आहे."

यौगंधरायणाला प्रथम वाटलें कीं या सत्काराचा

स्वीकार करणें म्हणजे शिक्षेऐवजीं बक्षिस स्वीकारण्यासारखें हीनपणाचें होईल. एकप्रकारें हे मंत्री आपल्याला ही भेट पाठवून लाजवीतच असावेत. परंतु इतक्यांत कांचुकीयानें पुन्हां माहिती आणली कीं, वत्सराज व वासवदत्ता यांच्या विवाहाचा मंगलसोहळा चालला आहे.

उदयन वासवदत्तेला घेऊन पळून गेला हें ऐकून वासवदत्तेची आई राणी अंगारवती हिनें हाय खाल्ली. ती राजमहालाच्या गच्चीवरून खालीं उडी टाकून आत्महत्त्या करण्याच्या प्रयत्नांत होती. एवढ्यांत स्वत: महासेनच तेथें आला. त्यानें तिची समजूत घातली व सांगितलें, "क्षत्रियधर्माला अनुसरून आपल्या मुलीचा विवाह झालाच आहे. तेव्हां अशा आनंदाच्या वेळीं दु:ख कसलें करतेस?" तेव्हां वत्सराज व वासवदत्ता यांचीं चित्रें एका फलकावर रंगवून उज्जयिनींत त्यांचा विवाहसोहळा थाटामाटानें करण्यांत आला. आणि त्या आनंदाप्रीत्यर्थच वत्सराजाचा मंत्री यौगंधरायण याचा सत्कार करण्यासाठीं त्याच्याकडे कंचुकीच्या हातीं सुवर्णपात्र पाठविण्यांत आलें. आपली प्रतिज्ञा शेवटास गेलेली आहे व महासेनालाहि हा विवाह मान्य आहे हें पाहून यौगंधरायणानें त्या भेटीचा स्वीकार केला.

संस्कृत साहित्य सरितेची पुस्तकें

२५

१. रघुवंश
२. शाकुंतल
३. विक्रमोर्वशीय
४. मृच्छकटिक
५. प्रतिमा
६. महावीरचरित
७. उत्तररामचरित
८. मालतीमाधव
९. स्वप्नवासवदत्ता
१०. दशकुमारचरित : भाग १
११. दशकुमारचरित : भाग २
१२. वेणीसंहार
१३. कुमारसंभव
१४. मालविकाग्निमित्र
१५. हर्षचरित
१६. नागानंद
१७. पंचरात्र
१८. रत्नावली
१९. कादम्बरी
२०. मेघदूत
२१. शिशुपालवध
२२. किरातार्जुनीय
२३. बुद्धचरित
२४. मुद्राराक्षस
२५. प्रतिज्ञायौगंधरायण
२६. अविमारक
२७. अभिषेक
२८. मध्यमव्यायोग
२९. कर्णभार
३०. ऊरुभंग
३१. पार्वतीपरिणय
३२. नलोदय

प्रत्येकी किंमत ६ आणे

६ आणे

व्होरा अँड कंपनी पब्लिशर्स प्रायव्हेट लि.